देहधारी स्त्रीपुरुष हाच अर्जुन समजून व त्याच्या शरीरांत श्रीकृष्ण भगवंताचा कसा खेळ चाललेला आहे, आपणा प्रत्येकास हें दैन्य, हे क्लीबत्व टाकून संसाररूप मायेतून आपल्याच शरीरद्वारे परमेश्वराला आपलेसें कसें करतां येईल, हें विचार करण्यासारखे आहे. इतकेंच नव्हे तर आपल्या आयुष्याचें तेंच एक ध्येय आहे.

तरी पण सवाल उभा राहातोच कीं, देवाचें अस्तित्व मानावयाचें कशाकरितां ? आम्हीं हे सर्व गुलामगिरीचे विचार टाकूं पाहातों आणि तुम्हीं त्याचें विवेचन पुन: पुन्हां कशासाठीं करतां ? सध्यांचें जग व्यापारी दृष्टीचें आहे, तर देवाचें अस्तित्व मानून त्यांत फायदा काय ?

ह्याला उत्तर हेंच कीं, व्यापार, धंदा, संसाराची धडपड हीं सर्व सुखासाठीं ना ! ह्या सुखाच्या पाठीमागें लागतां तें दूर दूर पळतें हा तर प्रत्येकाचा अनुभव आहे. संत म्हणतात " सुख पाहतां जवा पाडें, दुःख पर्वताएवढें. " हे खरे ना ? लोकेषणा व वित्तेषणा मिळवितांना कधीं तरी तृप्ति होते काय ? सार्वभौम राजा सुखी असतो काय ? तुम्ही आम्ही सुखी आहोंत काय ? " जगीं सर्व सुखी असा कोण आहे, विचारी मना तूंचि शोधूनि पाहें" असें श्रीसमर्थ रामदास स्वामी बोलले तें खरें आहे ना ?

असे जरी आहे, तरी निद्रावश झालेलें माणूस जेव्हां गाढ झोंपेतून जागें होतें तेव्हां तें म्हणतें, " मला बरें वाटतें. " ज्ञानेंद्रियें जेव्हां जेव्हां आपआपल्या इंद्रियद्वारां अनुभव घेतात, तेव्हां तेव्हां ते जरी क्षणिक सुख असले तरी त्याची आठवण होऊन, हें सुख निरंतर कसें मिळेल, व माझ्या जवळ तें कायमचें राहील काय, ह्या विचारानें मनुष्य दुःखी होतो. हें कायमचें सुख आपणा स्वतःमध्यें आहे. तें मिळविण्यासाठींच परमेश्वराची सेवा आणि त्याचें चिंतन अंतर्बाह्य प्रभूच्याच कृपेनें त्याचें सान्निध्य जाणून अनुभव घेऊन, हें कायमचे सुख प्राप्त करून घेतां येतें, व इतर कष्टाळू प्राण्यांस तें देतां येतें.

हें संतांच्या पायांपाशीं कळून व दिसून येते. संतांइतके कनवाळू कोणीही नाहींत. परमेश्वरी चैतन्यामध्यें हे लीन झाले असल्यामुळे सर्वांचीं अंतःकरणें त्यांच्यापुढें आरशासारखीं लख्ख. परमेश्वराकडे लक्ष लागावें म्हणून लहानथोर सर्व प्राण्यांच्या आध्यात्मिक कल्याणाकडे त्यांचा यत्न सदोदित चाललेला असतो. ते त्यासाठीं आपला स्वतःचा देह एकसारखे कष्टवीत असतात. हा प्रकार श्रीसाईबाबांकडे अहर्निश चालावयाचा. कोणाच्याही शरीरांत दुखूं लागले कीं, त्याने बाबांचा धांवा करावा. कीं इकडे बाबांनीं तें दुखणे आपल्या स्वतःच्या शरीरांत ओढून घेऊन त्या प्राण्याची त्या दुःखापासून सुटका व्हावी. हे प्रकार अनेकानीं शिरडीस श्री सांईबाबांच्या पायांजवळ बसून पाहिलेले आहेत.

निवळ कास्मिक एनर्जी ह्या कोरड्या शब्दानें समाधान व्हावयाचें नाहीं. मागे सांगितल्याप्रमाणें कास्मिक एनर्जी, एक अफाट, अगम्य, अतर्क्य, अनिर्वचनीय, सर्व शक्तिमान, न आदि न अंत अशी आहे. तिलाच श्रीहरि, परमेश्वर, गॉड, अल्लाह असें नांव देऊन, तिच्याच इच्छेनें हीं सर्व अनंत कोटि ब्रह्मांडें आपणांसारख्या क्षुद्र प्राण्यांसहित निमार्ण झालेलीं आहेत. तीच त्याची लीला, त्याची माया, तीच श्री अन्नपूर्णा, श्री दुर्गा, श्री सरस्वती श्री भवानी, श्री हिंददेवी, तिचे अस्तित्व जसे बाहेर तसेच आपल्या आंत परिपूर्ण आहे, त्याचा अनुभव घेऊन अखंड सुख प्राप्त करून घेण्याचे व जनतेला देण्याचे आपले आद्य कर्तव्य आहे.

येथें पुन्हाही आधुनिक पाश्चात्यशास्त्राचे अभ्यासी असें म्हणतील कीं, क्वचित थोड्यांना अशा सुखाची प्राप्ती होते. सामान्य जनतेला त्यापासून काय फायदा? तुम्ही त्याना असेच " मतामतांच्या गलबल्यांत " दीनदुबळे ठेवणार काय? त्याला जबाब एवढाच कीं, जर तुम्ही ईश्वराचे अस्तित्व मानून सन्मार्गानें चालाल तर सामान्य जनता तुमचे तात्काळ अनुकरण करील. तुम्ही पाश्चात्यांचे केवळ दुर्गुण घ्याल तर जनता त्याप्रमाणें तुमचें अनुकरण करील.

सनं १८६१ साली जेव्हां लेखकाच्या वडिलांनीं आपल्या पहिल्या मुलाला आपले परमप्रिय स्नेही कै. रामचंद्र बाळकृष्ण, करसनदास मुळजी, व वासुदेव बाबाजी नवरंगे, ह्या गृहस्थांबरोबर विलायतेला शिक्षणासाठीं पाठविलें त्या रात्रीं, धर्म बुडाला, धर्म बुडाला, असा पुकारा करून चांगल्या शिकलेल्यासवरलेल्या लोकांनीं कांदेवाडींतल्या आमच्या राहत्या घराला आग लावली. पोलीस धांवून आले, आणि त्यांनीं ती आग विझवली. आज आपले पंधरा हजारावर विद्यार्थी पाश्चात्य देशात शिकत आहेत आणि सुमारे तीन कोटी रुपये त्यांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ आपली जनता दरवर्षी खर्च करीत आहे.

पाश्चात्यांच्या विद्येपासून उत्तम ते आपण जरूर घेतलें पाहिजे. त्यांच्या शोधांकडे पूर्ण लक्ष्य देऊन, त्याप्रमाणे आपण शोध करून, जगात पुढे पाऊल टाकले पाहिजे. असें करताना आपले शील कायम ठेवून आपल्या पूर्वजांनीं आपल्याजवळ परमेश्वराच्या स्मरण रूपि भक्तीचा ठेवा ठेवलेला आहे तो ज्याने त्याने आपआपल्या भूमिकेप्रमाणें कायम ठेवून आपली अध्यात्मिक उन्नति केली पाहिजे. अध्यात्मिक उन्नतीने आपला आत्मविश्वास वाढेल, आत्मविश्वासाने आपल्या नैसर्गिक नेतृत्व व कर्तृत्वशक्तींचा पूर्ण विकास होईल. मात्र हें करतांना फसवेगिरीचा सर्व नीच प्रकार साफ दूर केला पाहिजे; तरच आपण पुन्हा उन्नतिप्रत जाऊ. हे पाहून जनता आपलें तात्काळ अनुकरण करून, सध्यांचे क्लीबत्व धडाडीने टाकून देईन.

श्री साईबाबांनीं प्रेमानें संबोधिलेला.

" म्हातारा "

## भूतदया

" अग इकडे ये, लवकर ये, ही पांहा तुझ्यासाठीं कोणी भेट ठेवलेली आहे ती. "

पतिरायाचे शब्द ऐकतांच, सुंदराबाई घराच्या मागल्या पडवींतून पुढल्या ओसरींत धांवून आल्या. यजमानांनीं एका कोंपऱ्याकडे बोटानें खूण

केली. सुंदराबाई तिकडे पाहातात तों एक सुमारें ४।५ वर्षांची पोर दडून बसलेली दिसली. केसांच्या झिंज्या झालेल्या, हातापायांच्या निव्वळ काड्या, बरगड्या बाहेर निघालेल्या, डोळे, गाल, आणि पोट यांचे खळगे झालेले, कमरेभोंवतीं एक चिटकून अतिसाराने घाण झालेले, त्याच्यावर माशा भण-भणताहेत, वर्ण अत्यंत काळा, मुद्रा कुरूप, आणि भेसूर, अशी ती दारि-द्र्यानें गांजलेली लहान मूर्ति पाहून सुंदराबाईंचे अंतःकरण कळवळून आलें. डोळ्यांतून पाणी वाहूं लागले.

" आई, आईग, कोण चांडाळीण तुला टाकून गेली ग !" असे बोलून त्या पोरीला उचलून त्यांनी तिला घरांतल्या मागल्या पडवींत नेलें. गरीबाची लहान पोर ती. घाबरली. आणि बोलली " बाय मला मारूं नको. आय् फांटला मला ठेऊन शान गेली. आन् सांगलं हकड् बस मी खायला घेऊन येतं थतवर हकडून हालूं नको. म्हून मी आयची वाट बग तूं. "

सुंदराबाईंनीं तिला धीर दिला आणि सांगितलें. " तुझी आय आली म्हणजे तिच्याबरोबर जा. "

असे बोलून तिच्या झिंज्यांना तेल लावलें. तेल लावतां क्षणीं आणि केंस विंचरतांना शेकडों लिखा भरभर निघाल्या. तें पाहाताच घरच्या ब्राह्मण स्वयंपाक्याला आणि बाल्या नोकराला किळस येऊन रागही आला, पण मालकिणीपुढें त्यांचे कांहीं चाललें नाहीं.

पोरीला गरम पाण्यानें आंघोळ घालून स्वच्छ केल्यावर थोडें गरम दूध पाजले. पोर म्हणाली " आये आणखी दूध देना ? " माउली म्हणाली, " बये जास्त दूध तुला जिरायचं नाहा. आतां तूं नीज. " असें बोलून आपल्या स्वतःच्या पातळाची धुवट घडी काढून, तींत त्या पोरीला गुंडाळून आपल्या स्वतःच्या बिछान्यावर निजवितां क्षणींच ती पोर झोंपी गेली.

हें सर्व चाललें असतां आजूबाजूंच्या घरांतून ब्राह्मण प्रभू आणि शेणवी गृहस्थांच्या स्त्रिया हा सोहळा पहावयास धांवून आल्या. शेजारच्या रामभाऊंच्या श्रीराममंदीराचे मालक—ज्यांना पण रामभाऊ म्हणत—धांवून

आले. ते म्हणाले, " अहो बायजाबाई "—सुंदराबाईंना ह्या नांवानें लहान-थोर सर्व लोक संबोधित असत--" हें तुम्ही काय मांडलेंत ? अहो तिच्या कपाळावरच्या गोंदण्यावरून ही पोर तर महारमांगाची दिसते." बायजाबाई बोलल्या "रामभाऊ, असे ना का कोणाची, माझ्या आसऱ्याला आली, आणि तिला मी हांकलून दिली, तर देव काय बोलेल ? " हें ऐकून रामभाऊंच्या आणि त्या स्त्रियांच्या डोळ्यांना पाणी आलें.

आदल्या वर्षी पाउसाच्या कमतरतेमुळें दुष्काळ पडला होता. त्यामुळें हजारों लोक पायवाटेनें मुंबईला चरितार्थसाधनासाठीं आले होते. त्या वेळीं आगगाड्या नव्हत्या. विहाडचें तळें नव्हतें. वाखा म्हणे मी. शेंकडों, हजारों लोक अन्न अन्न करीत भुकेनें व्याकुळ होऊन मेले. हजारों वाख्याच्या तडाख्यांत सांपडून मेले. कोण त्यांचे हाल ! किती भयंकर त्यांचें दैन्य आणि विपन्नावस्था ! मुंबईतल्या धनसंपन्न लोकांनीं अन्नसत्रें वगैरे काढून आपआपल्या परीनें पुष्कळ मदत केली. ती किती पुरणार ! त्यांतून जे वांचले त्यांना परत देशीं जाण्याच्या साधनांच्या अभावीं भीक मागून गल्लोगल्लीं फिरावें लागलें.

नंतर पावसाळा सुरू झाला. आषाढ महिन्यांत पाऊसाची जी झोड मुंबईंत लागत असते ती केवळ मुंबईकरांनाच ठाऊक. कपडे वाळावयाचे नाहींत, चुली पेटावयाच्या नाहींत, धुरानें जीव हैराण व्हावयाचा, सैंपाकाला मनस्वी वेळ लागावयाचा. घराचें लांकूड सामान देखील सर्द व्हावयाचें. मागल्या पडवींत छप्पर धुरानें काळें झाले असल्यामुळें. त्या सर्द छपरांतून वाळत घातलेल्या कपड्यांवर काजळाच्या काळ्या पाण्याचे टिपके पडून कपड्यांची कशी धाण होत असते ती मुंबईकरांनाच ठाऊक.

अशा पावसाळ्यांत सशक्त मनुष्याला देखील सर्दीमुळें अमांश आणि अतिसार होतात. मग अन्नासाठीं तळमळणाऱ्या आपद्ग्रस्त गरीबाचे व त्याच्या पोरांचे कसे हाल होत असतात ते पाहावयास दूर जावें लागत नाहीं. नंतर अन्नासाठीं लहान लहान चोऱ्या करून आणि पुढें बदमाषांच्या आखाड्यांत

सांपडून पहिल्याने पहिल्यानें खिसेकापू, पुढे बिलंद चोर, त्याचप्रमाणे वेश्या, ही त्यांचीं रूपांतरें कशीं होतात हें पोलिसचे रिपोर्ट सांगू शकतात.

काळजीपूर्वक जतन आणि खाण्यापिण्याची व्यवस्था लावल्यामुळे ती पोर तीनचार महिन्यांत हुशार झाली, आणि बायजाबाईंना पोरवया-प्रमाणें गृहकृत्यांत मदत करूं लागली.

बायजाबाई त्या वेळीं अपत्यहीन होत्या असेही नाहीं. त्यांना तीन सुंदर मुले होतीं. मोठ्या मुलीचें वय सुमारें १०।११, मुलाचे वय ७।८ आणि धाकट्या मूलीचे ३।४.

बायजाबाईंचे पति नारायणराव मुंबईंत कस्टम खात्यांत मोठ्या हुद्या-वर नोकरीस होते. त्यांचें घर धूसवाडींत राममाऊंच्या श्रीराममंदिरा-समोर डाव्या हातावरचें पहिले. धुसवाडींत ब्राम्हण, शेणवी, परभू गृहस्थांचीं घरें अद्यापि आहेत. त्या वेळचा सर्व गृहस्थांच्या स्त्रियांचा बायजा-बाईबरोबर अत्यंत स्नेहभावाचा घरोबा होता. बायजाबाईंस लिहितांवाचतां येत असे आणि त्यामुळें त्यांच्या घरीं अथवा शेजारच्या श्रीराममंदिरांत श्रीरामविजय, श्रीहरिविजय, यांचीं पारायणें होत असत, तेथे त्या सर्व स्त्रिया कथाकीर्तन व पुराण श्रवणासाठीं जमत असत. बायजाबाईनीं आपल्या मुलांबरोबर त्या मुलीला देखील लिहावाचावयाला शिकविले, आणि पुढें ती मुलगी त्या सर्व उंचवर्णांच्या स्त्रियांबरोबर श्रीराममंदिरांत कथा, कीर्तन, पुराण ऐकण्यासाठीं जाऊं लागली. अभिमानाची गोष्ट ही कीं, त्या पैकीं कोणीही स्त्रीने अथवा त्या आणि दुसऱ्या मंदिरांच्या व्यवस्थापकांनीं त्या गरीब पोरीला हरकत केली नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्या नंतर थोड्याच वर्षांनीं बायजाबाईचें जेष्ठ बंधु रा. ब. दादोबा पांडुरंग यांनीं स्थापन केलेल्या परमहंस सभेची, किरिस्तांवाच्या हातचा पांव खातात, एवढयावरून दाणा-दाण उडाली, तरी ह्या गरीब पोरीला देवळांत जाण्याला कोणीही मज्जाव केला नाहीं.

पुढे दिलगिरीची गोष्ट अशी घडली कीं, ही मुलगी सुमारे तेराचवदा वर्षांची झाली. त्या वेळीं ती एकाएकी नाहींशी झाली. बायजाबाईंचे तिच्यावर इतकें प्रेम जडले होते कीं, ह्या आघाताने त्या बहुतेक वेडयापिशा झाल्या. पुष्कळ शोध केला; परंतु कांहीं पत्ता लागला नाहीं. सरते शेवटीं असें अनुमान निघाले कीं, ख्रिस्ती बायांनीं तिला पळवून नेलें असावें. त्या वेळीं ख्रिस्ती धर्मोपदेशक हिंदी बायांचा हिंदूंच्या घरांतून फारच सुळसुळाट असे. हिंदुधर्माचे हिडिस स्वरूप दाखवून, हिंदु स्त्रीपुरुषांना ख्रिस्ती करण्याकडे त्यांचे आटोकाट प्रयत्न सतत चालू होते हे लेखकानें स्वतः पाहिलेलें आहे. पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावानें आणि आपल्या देशावर असलेल्या त्यांच्या स्वामीत्वामुळें त्या वेळच्या शिक्षण घेतलेल्या तरुणांच्या मनावर भयंकर आघात झाला होता. हा आघात ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज ह्या संस्थांनीं आणि त्यानंतर ३० वर्षांनीं, श्रीविवेकानंदांनीं जर परतवला नसता तर आपली स्थिती विशेष निःसत्व झाली असती.

ही गोष्ट ऐंशीं वर्षांपूर्वीची आहे लेखकाने खुद्द बायजाबाईंच्या, आपल्या पित्याच्या, व वडील काकांच्या, तोंडून ऐकलेली आहे. बायजाबाईंची तेजस्वी व ममतायुक्त मूर्ती लेखकाच्या मन.चक्षुंपुढे उभी आहे. अशी दुसरी मायाळू स्त्री त्याने अद्यापि पाहिली नाहीं श्रीसाई बाबांनीं लेखकाच्या कुटुंबाला तिच्या लहानपणींच्या गोष्टींच्या आठवणी सन १९११ सालीं तिला तिच्या पहिल्या दर्शनाच्या वेळीं दिल्या, आणि ज्या आठवणींची तिला त्या वेळीं पूर्ण विस्मृति होती, त्या वेळीं बायजाबाईंची आठवण काढून "आये तुझी आजी ( आईची आई ) लई नामी बाई माणूस होती. मी तिला ओळखत होतों." असें बोलले.

पाश्चात्य शिक्षणाने आपलें पाऊल, आपलें शीलसंवर्धनापुढे गेलें आहे किंवा कसे, याचा विचार करतांना मन घोटाळ्यांत पडतें. जरी कर्मठपणाचा त्या वेळीं फारच जोर होता, जरी मतामतांच्या बाबतींत प्रखर विरोध होता, तरी लेखकाला त्या वेळीं सर्व निरनिराळ्या जातीजातींतल्या स्त्रीपुरुषांना पर-

स्पर्शविषयीं जो आदर व अभिमान दिसून येत होता, तो आज नाहीं. हे कां व कसे, आणि आपले कोठे चुकत आहे, आपण खरोखरी उच्च ध्येया-प्रत जात आहोंत, कीं घसरून खालीं पडत आहोंत याचा ज्याने त्याने सूक्ष्म विचार करावा.

सन १९१४ च्या सालीं शिरडीस असतांना लढाईसंबंधाने लेख-काच्या मनांत कांहीं विचार आले. त्याच वेळीं त्याच्या कुटुबाने लढाईविषयीं बाबाना उघड विचारले, तेव्हां बाबा म्हणाले " आये लई खराब दिवस येणार आहेत लोक गल्लोगल्लीं नागवे फिरतील, एकमेकांना फाडफाडून खातील. तेव्हां देवाची आठवण होईल. मग पुढे चागले दिवस येतील " ह्या बाबांच्या शब्दाचा वाचक पूर्ण विचार करतील अशी आशा आहे.

सर्व भक्तांचा चरण रज
" म्हातारा "

## अनुभव

दसऱ्याचा दुसरा दिवस. आश्वीन महिना. सन १९१७ सालची गोष्ट. ह्या दिवशीं दोनप्रहरीं श्री साईबाबांच्या पायापाशीं माझा मित्र, त्याची बायको व मी असे बसलों असतां, श्री माझ्या मित्राच्या बायकोला म्हणाले " आये, तुला काय पाहिजे माग." बाईने बाबाच्या पायांवर मस्तक ठेवून त्यांना नमस्कार केला, आणि त्या म्हणाल्या "बाबा, मला जन्म-मृत्यूच्या फेऱ्यांतून सोडवा. " बाबा प्रेमाने हंसून म्हणाले " आये हेच मागि-तलेस ? आपण काय मरायला आलो आहोंत !" बाई बिचारी गोंधळांत पडली. तरी नम्रतेने ती बोलली " बाबा तुम्हीं काय बोलतां ते मला मुळींच समजत नाहीं. " तेव्हा बाबा तिच्या नवऱ्याकडे बोट दाखवून म्हणाले " ह्याला विचार तो तुला सांगेल." मित्र म्हणाला " बाबा आपणच सांगावे. मी कसें समाधान करूं शकेन ? " एवढ्यांत कांहीं मंडळी दर्शनासाठीं आली. तेव्हां बोलणे तसेंच राहिले. कांहीं वेळाने बाबांनीं सर्वांना उदी देऊन वाड्यांत जाण्याला सांगितले त्या प्रमाणे आम्हीं सर्वांनी श्रींच्या

हातून उदी घेतली. श्री उदी देतांना त्याच्या उजव्या हाताच्या अंगुठ्यानें भुवयांच्या मध्ये किंचित् जोर देऊन व दुसरीं बोटे भक्ताच्या डोक्यावर ठेवून सर्वेही पाच बोटांच्या उदीच्या खुणा त्याच्या डोक्यावर उमटवीत असत. उदी देतांना श्रींनीं बाईला आपल्या नवऱ्यापाशीं खुलासा मागण्याचा पुन्हा इशारा दिला आणि बोलले "आये ह्याला विचार आणि घंटा भरानें पुन्हा या बरे."

आम्ही दीक्षितांच्या वाड्यांत उताऱ्याच्या जागीं आल्यावर बाईचा आपल्या भ्रताराबरोबर झालेला संवाद लेखकाने ऐकला तो स्मरणपूर्वक देत आहे.

" बाबा हें काय बोलले मला मुळींच समजत नाहीं. "

" मला तरी काय कळते ? "

" मग आपल्यापाशीं खुलासा व्हावा कसा ? "

मित्र काहीं वेळानें विचार करून बोलला " हे पाहा आपण सर्व खरे-खरे अमर आहोंत ही जाणीव देण्याच्या हेतूने बाबा बोलले असावे. "

" मरण हे ठरलेले आणि आपण अमर कसे ? तुम्ही कांहीं तरी बोलतां श्री मारुतीराय, बिभीषण वगैरे अमर." बाई बोलली.

"तें तर खरेंच. पण तूं विचार कर.आपण मरतों तेव्हां काय होते?'

"शरीर जागच्या जागीं राहाते, आणि जीव निघून जातो. "

" जीव म्हणजे काय ? "

" जीव म्हणजे जीव ! "

" बरें तो जीव काय करतो ? "

" दुसरीं शरीरें धरतो, संसार करतो, आणि त्याचीं तीं शरीरें पुन्हां मरतात. म्हणूनच तर जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सोडविण्यासाठीं बाबांजवळ मी मागणे केले ! "

" बरें तूं झोपी जातेस तेव्हां तुझा जीव कोठें असतो ? "

" माझ्या शरीरांत ! "

" त्याची त्या वेळीं तुला आठवण असते काय ?"

" नाहीं "

" झोंपेंतून जागी झाल्यावर तुला बरें वाटतें तें कसें ?"

" कोणाला ठाऊक. बरें वाटतें एवढे मात्र खरें. "

" एकूण जीव पुनः पुनः जन्म घेत असतो, त्याचीं तीं तीं शरीरें मात्र मरतात. जीव कांहीं मरत नाहीं असे तुला खात्रीपूर्वक वाटते ना ! "

" होय "

" तर मग पुन्हां पुन्हा जन्ममरणाची कटकट केव्हां नाहींशीं होते?"

" देवाची भेट झाल्यावर. "

" आतां बाबा तुला साक्षात् देवरूपी दिसतात असें तूं म्हणतेस तर तूं आतां जन्ममरणांतून सुटलीस. "

" अजून तशी खात्री वाटत नाहीं. "

" कां ?" बायको बापडी स्तब्ध झाली.

मित्र म्हणाला, देवाचे भेटणें म्हणजे साक्षात्कार होणें. देवाची लीला अगाध आहे. भक्तासाठीं त्या भक्ताने इच्छिलेले रूप घेऊन त्याला त्याप्रमाणें भेट देण्याला तो पूर्ण शक्तिमान आहे. आपल्या प्रिय भक्तासाठीं तो काय न करूं शकेल ? तरी पण अशी जव्हा देव भेट देतो त्या साक्षात्काराच्या शेवटीं त्या आपल्या प्रिय भक्ताला आत्मसाक्षात्कारानेच आपले खरे रूप दाखवितो. आत्मसाक्षात्काराने भक्ताची पूर्ण अनुभवाने खात्री होते कीं देव आणि आपण निरनिराळे नाहींत. जीव आणि शिव एकच. बाबाना तूं बोलताना ऐकले आहेस ना कीं "जो बोलतो कीं बाबा इकडे शिरडींत बसलेला मी पाहिला त्याने बाबाला मुळींच नाहीं बघितला ? "

" होय असें ते बोललेले मी ऐकले, आणि विचारांत पडले कीं असें कसें ! "

" त्याचे कारण आपण शिरडींत देहधारी बाबा पाहतों. अलबत त्याचे सर्व करणे आपल्या अकलेच्या सर्वस्वी आटोक्याच्या बाहेर आहे. त्यांचें शरीर म्हणजे तुझ्या माझ्या सारखे शरीर नाहीं. आपल्याला त्याचें दर्शन आणि त्याचा वरदहस्त आपल्यामाथ्यावर पडला हें आपलें लहान सहान भाग्य नाहीं. तरी पण बाबाचे खरे स्वरूप जाणण्याला आपल्याला आत्मसाक्षात्कारी झाले पाहिजे, म्हणजे जीव आणि शिव आपल्यामध्ये त्याप्रमाणे सर्वांमध्ये एकच आहे असा पूर्ण अनुभव येऊन बाबाचे खरेखरें स्वरूप आपल्याला दिसेल. तू स्वतः शिवस्वरूपी आहेस. "

" काय मी शिव ? छे छे असे बोलणे पाप आहे. मी जीव. "

" होय असे तुला वाटणे साहजिक आहे आणि त्या मुळेच आपल्याला अनेक जन्म घ्यावे लागतात, हे जन्म घेता घेता जेव्हा मनुष्य संसार रूपी यातनाना कंटाळून जाऊन परमेश्वरावर प्रेम करावयास लागतो, तेव्हा तो दयाळू प्रभु भक्ता साठीं वेडा होऊन तो श्री साईबाबासारखीं आपलीं मार्गदर्शक दैवी रूपें दाखवून त्याचे कोट कल्याण करतो. गम्मत अशी कीं, तो भक्त प्रेमानंदांत तल्लीन होऊन देहभावनेवर असतो, तेव्हा देवा तू माझा धनी, मी तुझा नोकर, माझ्या हातून तुझी काहीं तरी सेवा होऊंदे, असे म्हणून शरीराने, वाचेनें, आणि मनाने एकासारखे प्रयत्न करीत असतो त्या नंतर प्रेमानंदात विशेष लीन झाला म्हणजे सर्वसाक्षी सर्वांतर्यामी प्रभु माझाच आहे अशी त्याची भावना होते, ह्या वेळी बाह्य सृष्टीची व आपल्या स्वतःच्या शरीराची त्याला विस्मृति व्हायला लागते. ती पूर्ण विस्मृति होऊन, म्हणजे झोंपी नव्हे हो, तो समाधिस्थितींत गेला म्हणजे प्रभु व मी एकच आहोंत हे त्याच्या पूर्ण अनुभवाला येऊन त्याला अत्यानंद होतो. तो आनंद कसा, काय, तूं काय अनुभविलेस, वगैरे तो देहभावनेवर परत आल्यावर त्याला विचारता, तें त्याला सागता येत नाहीं. "

"आता तूं समजलीस बाबा कां म्हणाले 'आपण काय मरायला आलोत' म्हणून ! त्यांच्या शब्दांनीं आपल्या अमरत्वाची खात्री खरोखरीच झाली ना ?"

ती म्हणाली " होय, पण अजून माझे समाधान होत नाहीं. " तो म्हणाला " आत्मसाक्षात्कार होई पर्यंत पूर्ण समाधान होणें अशक्य. आतां आपण बाबांच्या दर्शनाला जाऊं तेव्हा तूं आणि मी मनात एकच विचार ठेवावयाचा कीं, " बाबा आम्ही अज्ञान लेकरें आहोंत, आपली आमच्यावर कृपा असावी "

मी हे सर्व लक्षपूर्वक ऐकत होतो. आणि जेव्हां आम्ही बाबांच्या दर्शनासाठीं पुन्हा गेलो तेव्हा जरी चार मंडळींची गर्दी होती तरी त्यातून श्री माझ्या मित्राच्या बायकोला बोलले " आये " मित्राकडे बोट दाखवून " ह्याचे सर्व बोल मी ऐकत होतों. ते ध्यानात ठेव. माझे बाळ गोपाळ आले, म्हणजे मला लई बर वाटतं. आणि दोन घांस मी आवडीने खातों. "

सर्व भक्ताचा चरणरज

" म्हातारा "

श्रीमाधवराव देशपांडे आज दुपारीं भेटावयास आले. श्रीसद्गुरु माउली-विषयीं बोलतां त्यांनीं " जया मनीं जैसा भाव, तया तैसा अनुभव " या श्रींच्या आरतींतल्या एका वाक्याबद्दल एक मजेचा अनुभव सांगितला तो येणेप्रमाणे:—

" सुमारे चवदापधरा वर्षांपूर्वीची गोष्ट श्रीरामनवमीच्या यात्रेचा दिवस. त्या दिवशीं बेसुमार यात्रेकरू श्रींच्या-बाबांच्या दर्शनासाठीं आले होते. किमान पक्ष साठपांसष्ठ हजारावर यात्रा जमली होती. मामलेदारसाहेब, इन्स्पेक्टर ऑफ पोलीस आणि इतर लहानथोर अंमलदार बंदोबस्तासाठीं हजर होते. बाबा सकाळपासून बसले होते ते अकरा वाजून गेले तरी आपल्या जागेवरून हालले नाहीं. भक्तमंडळींनीं पोलीसला विनंती केली कीं, यात्रा काहीं वेळ थांबवून ठेवा आणि देवाला न्याहारी करूं द्या. बाबा म्हणाले, " मला भूक नाहीं ! "

या वेळीं मशिदीच्या आवारांत आणि बाहेर माणसाची रेटारेट चालली होती. उन्हाळयाचा तो दिवस, अंगांतून घामाच्या धारा एकसारख्या चालल्या आहेत; पण यात्रेकरूंचा उत्साह कांहीं अपूर्व होता. प्रत्येक इसमाची दर्शनासाठीं धडपड चालली होती.

अशा वेळीं एक मराठमोळ्याची बाई, सुमारे पासष्टसत्तर वर्षांची, वार्धक्याने शरीर कृश झालेलें, थकलेले, आंगात कांहीं त्राण नाहीं अशी, आवाराबाहेर गर्दींत सारखी आक्रोश करीत होती-" अरे ! मज गरीब म्हातारीवर दया कर रे ! बाबा ! तुझं दर्शन देरे " असे ओरडत त्या भयंकर उन्हांत सारखी तळमळ करीत होती. त्या गलबल्यांत तिच्याकडे पाहातो कोण आणि तिचे ऐकतें कोण ? " इतक्यात मी त्या गर्दींतून देवाच्या सेवेसाठीं जात होतों,त्या वेळीं त्या म्हातारीची ती दयाजनक हांक ऐकून,जी हांक देवाला ( श्री सांईबाबांना ) केव्हांच पोंहचली होती, त्यामुळे देवाच्या प्रेरणेने माझ्या मनांत दया उत्पन्न झाली. म्यां त्या म्हातारीचा हात पकडला, आणि म्हटलं, चल बये माझ्याबरोबर. मी तुला देवाचे दर्शन घडवितो. त्या म्हातारीला जो आनंद झाला तो मी अद्याप पावेतों विसरलों नाहीं. पोलिस पार्टी वगैरे मला ओळखत असल्यामुळे त्या भयकर गर्दींतून व रेटारेटींतून आम्हांला वाव मिळाला. देवाच्या जवळ जाताच त्या म्हातारीने आरोळी करून देवाच्या कमरेला घट्ट मिठी मारली. डोळयांतून अश्रूंचे पूरवाहत होते. कांहीं वेळपर्यंत तिच्याने बोलवेना. देवाने तिच माथे आणि पाठ कुरवाळून तिला तिच्या घरच्या बारीकसारीक गोष्टी विचारल्या, आणि म्हटले " आये मी कंवापासून तुझी वाट बघतुं ग ! तूं मला खायला काय आणलंस?" म्हातारीने म्हटले" बाबा, मीं एक भाकर नि दोन कांदे आणले. वाट चालून चालून थकलें. सकाळला ओढयावर अर्धी भाकर नि एक कांदा खाल्ला. आतां मजपाशीं अर्धी भाकर आणि कांदा आहे तो तूं खा." असे म्हणून आनंदानें पदराश बांधलेली ती अर्धी भाकर आणि कांदा देवाला दिला. देवाने तं पदार्थ तेथच्या तेथेच खाल्ले आणि म्हटलें " आये तुझी भाकर

मला लय गाड लागली ग ! " हें पाहून मला आनंदाचें भरतें आलें. म्यां विचार केला काय ह्या देवाची ही लीला !

त्या म्हातारीला आपण कृतार्थ झालें असें वाटले तिने देवाच्या हातचा प्रसाद आणि उदीं घेतली आणि तेथून निघाली. पोलीस पार्टीने तिला त्या गर्दीतून सुखरूप बाहेर काढले. म्हातारी आनंदाने बेहोष झाली होती."

श्री माधवराव म्हणाले "बाबासाहेब, ही गोष्ट मी कधींही विसरणार नाहीं. म्यां मनात खूप गाठ मारलीं कीं, 'जया मनीं जैसा भाव तया तैसा अनुभव' या वाक्याप्रमाणेंच ही गोष्ट घडली आहे."

श्री माधवरावांना आणखी कांहीं असे अनुभव सांगा म्हणून आग्रह करता ते म्हणाले, "पाहूंहो बाबासाहेब, देवाच्या स्फूर्तीप्रमाणे मी पाहिलेल्या सर्व लीला प्रसिद्ध होतील"

वांद्रे
ता. २२ सप्टेंबर १९२९ } रा. आ. तर्खड

## अश्वत्थवृक्ष

श्रीमद्भगवद्गीतेतल्या १५ व्या अध्यायात वर्णन केलेला अश्वत्थवृक्ष हा बहुतेक काहीं तरी कल्पितवृक्ष असावा असे समजतात. पण सूक्ष्म विचाराअंतीं हा वृक्ष आपल्याच शरीरांत असलेला ज्ञानतंतूंचा समुदाय आहे अशी खात्री होते.

आपल्या डोक्यातला मेंदु, हा, त्या वृक्षाचं मूळ. त्याच्यापासून उत्पन्न झालेला पाठीच्या कण्यात असलेला ज्ञानतंतुमय दांडा हा त्या वृक्षाचं बुंध. या बुंधापासून फुटलेल्या फांद्या, अथवा डहाळ्या हे मुख्य ज्ञानतंतूंचे समुदाय, आणि त्या डहाळ्यापासून निघालेलें सूक्ष्म तंतूंचे जाळें हीं त्याचीं पानें वगैरे. हा विचार ग्रहण केल्याबरोबर वर मूळ आणि खालीं फांद्या या श्रीकृष्ण भगवंताच्या विवेचनाचा तात्काळ खुलासा होतो.

या वृक्षाच्या सहाय्याने आपण किती तरी उच्च स्थितीप्रत जाऊन पोहोंचूं या ज्ञानाचा प्रकाश पडतो या विषयाचा जितका विचार करावा तितका थोडाच आहे.

हा अश्वत्थ वृक्ष नाशिवंत आहे. देहपतनानंतर त्यांतून चैतन्यरूपी परमेश्वराचा खेळ बंद झाल्यावर देहासोबत या वृक्षाचा नाश होतो परंतु जों-पर्यंत त्यांतून चैतन्य खेळत असते तोंपर्यंत या वृक्षामार्फत आपल्या शरीरां-तल्या सर्व संसाररूपी आणि पारमार्थिक क्रिया चालत असतात.डोळे पाहातात, कान ऐकतात, नाक वास घेते, श्वासोच्छ्वास चालू असतो, हृदय शरीरांतून रक्त खेळविते,रसना पोषक असेच अन्न ग्रहण करिते. जठराग्नि प्रदीप्त राहातो, तो अन्न पचन करतो, मलमूत्र घर्मरूपी त्याज्य वस्तू विसर्जन होतात. हात, पाय व त्वचा याच वृक्षाच्या हुकुमाप्रमाणे आपलीं कामे करितात शुक्र आणि शोणित यानीं प्रजा निर्माण होते. मन आणि विचार हीं सर्व या वृक्षातल्या चैतन्यरूपी आधाराने आपआपले उद्योग चालवितात

देहाचा आणि बाह्यसृष्टीचा झोपेंत पूर्ण विसर पडत असतो. अशा वेळीं देखील जठराग्नि प्रदीप्त राहाण्यासाठीं श्वासोच्छ्वास, अन्नपचनादि क्रिया अबाधित चालतात. इतकेच नव्हे तर स्वप्नस्थितींत वाघ, सिंह, झाडें, झुडपे, डोंगर, पहाड, दऱ्या, नद्या, समुद्र वगैरे मूर्तिमंत प्रतिसृष्टि तो देह निर्माण करतो, आणि तिची प्रत्यक्ष भावना त्या वेळीं जागृता-वस्थेप्रमाणेच हुबेहूब त्याच्या शरीरावर पूर्ण रीतीने उमटते हा प्रत्येक मनुष्याचा अनुभव आहे चैतन्य जोंपर्यंत या वृक्षातून वावरत असतें तोपर्यंत बाह्यसृष्टीच्या पसाऱ्याचे ज्ञान होतें. ही झाली संसाराची गोष्ट. पण याउपरांत ह्या वृक्षाच्या ठिकाणीं असें कांहीं दुसरे अवर्णनीय व अफाट सामर्थ्य आहे कीं, भक्ति, उपासना, कर्म, ज्ञान अथवा योग याच्या साह्यानें याच अश्वत्थ वृक्षामार्फत संसारांत राहून, संसार तरून जाऊन आपल्या शरीरांत असलेल्या अंतःसृष्टींतून साक्षात् चैतन्याचा अनुभव घेता येतो.

आपल्या हरिविजय या अप्रतीम ग्रंथांत श्रीधर कवि श्रीकृष्ण भगवं-ताच्या जन्माचें फारच बहारीनें वर्णन करितात.

आपुल्या हृदय गोकुळीं ।
शांति यशोदे जवळीं ॥
सेजे पहुडला वनमाळी ।
पुराणपुरुष तो पहा ॥

या ओंवींतला प्रत्येक शब्द अनुभवाचा आहे. ही ओंवी निव्वळ काव्य नाहीं. या एकाच ओंवीवरून श्रीधरकवि आत्मसाक्षात्कारी पुरुष होते असें खात्रीपूर्वक वाटे. नाहीं तर ते "पहा" हा अनुभवसिद्ध हुकमी शब्द कधींही योजू शकते ना.

या एकच ओंवींत "हृदय गोकुळीं," "शांतियशोदे जवळी" "सेजे पहुडला" आणि "पुराण पुरुष" हे शब्द आत्मसाक्षात्कारी भक्ताशिवाय इतक्या अधिकारयुक्त वाणीने कधींही निघावयाचे नाहींत.

पुष्कळ आधुनिक स्त्रीपुरुष आहेत कीं,ज्याना श्रीकृष्ण ही काल्पनिक काव्यरूपी व्यक्ति आहे असे वाटतें आणि त्याना श्रीकृष्ण भगवानाच्या गोकुळांतील लीला अतिशयोक्तीच्या आणि कांहीं प्रसंगी त्याज्य अशा वाटतात.

लेखकालाही त्याच्या लहानपणीं अशाच विचाराचे शिक्षण मिळालें होतें; परंतु सर्वसाक्षी प्रेमळ प्रभूच्या आपल्या हृदयात ज्या अवर्णनीय लीला चाललेल्या या संसारतापातदेखील जसजशा त्याच्या अनुभवास आल्या, तसतशा आपल्या शरीरात प्रत्यक्ष वावरणाऱ्या हजारो गोपींचें श्रीकृष्ण भगवंतावर कसें निर्व्याज प्रेम आहे याची त्याला अचूक, पण आनंदमयी खात्री होत गेली.

श्रीकृष्ण भगवंताचे गोकुळ आपल्या प्रत्येकाच्या हृदयांत आहे. आणि प्रत्येक देहधारी आपलें सध्यांचे शरीर टाकून देण्यापर्यंत, आणि त्यानंतर कर्मफलांचीं गांठोडीं घेऊन वासनात्मक सूक्ष्म देहांमार्फत दुसरीं अनेक स्थूल शरीरे धारण करितां करिता आणि त्यासोबत ही श्री गोपींची आनंदमयी लीला विशेष आणि विशेष अनुभवता अनुभवता आपल्या स्वतःच्या सच्चिदानंदरूपाचा आत्मसाक्षात्काराने पूर्ण अनुभव घेतो त्याच

वेळीं त्याला श्रीकृष्ण भगवंताच्या रासक्रीडेचे पूर्ण ज्ञान होतें. हें होईपर्यंत रासक्रीडेविषयीं सर्व शब्दवल्गना व्यर्थ आहेत. अद्वैताची समाधिस्थिति ती हीच. ती अनुभवल्यानंतरही वर्णन करावयाला वाणी असमर्थ आहे.

## अनुभव

" आपण कोण ? आपण मरायला आलोंत काय ? " या श्रीसांईबाबांच्या शिकवणीचा उलगडा मागें केला आहे. या शिकवणीचा उपयोग काय, आणि फायदा काय ? अहो, आम्हीं अन्नान्नस्थितीला पोहोंचलों आहोत ! दिवसातून एक वेळ तरी पोटभर अन्न मिळेल काय याची भ्रांत. अशा स्थितींत " सोहं कोहं " या शिकवणीपासून सामान्य जनतेला उपयोग काय ? ( याचाही उलगडा प्रसंगविशेषीं श्रीसद्गुरु माउलीच्या स्फूर्तीनें होईल ) फारच थोडे ब्रह्मवेत्ते निर्माण होतात. असें आहे ना ?

ही गोष्ट अगदीं खरी आहे. पण ही ब्रह्मपदाची प्राप्ति ज्यांनीं अनुभवली अशाच पुण्यश्लोक विभूतींमुळे आज आपण हयात आहोंत. याच विभूतींचीं वचनें व स्मृति सध्यांच्या शोचनीय अवस्थेतून आपणाला पुनः उच्चतम स्थितीप्रत नेतील यात मुळींच शंका नाहीं.

श्री नागमहाशय या नावाचे सत्पुरुष डाक्का शहराजवळच्या एका खेड्यात राहात होते. हे थोड्याच वर्षांमागें ब्रह्मीभूत झाले. श्री रामकृष्ण परमहंसाचे उत्तमात उत्तम असे ते अनुयायी ते होते. अर्थात श्री विवेकानंदाचे ते गुरुबंधु होते. श्री नागमहाशयाना जसजसे त्याच्या सद्गुरूकृपेनें पूर्ण अनुभव येत गेले, ऋद्धीसिद्धि त्याच्या दासी बनल्या, तसेतसे ते विशेष विरक्त होऊन श्री भगवंताच्या प्रेमानंदात तल्लीन झाले.

जसा बलवान् पहिलवान आपले सामर्थ्य पूर्ण जाणून यःकश्चित मनुष्याबरोबर झुंज करण्यास बिलकुल उतरत नाहीं, तसा पूर्ण ब्रह्मवेत्ता आपले स्वतःचें सामर्थ्य जाणून, तो ते इतराना दाखविण्याच्या ( दांभिक प्रकाराचे ) कधींच प्रयत्न करीत नाहीं. इतकेंच नव्हे तर

जरी त्याच्या स्वतःच्या शरीराला कांहीं विकार झाला, जरी तो विकार दूर करण्यास तो पूर्ण सामर्थ्यवान असतो, तरी तो व्याधी नाहींशी करण्याच्या खटपटींत तो पडत नाहीं. स्वतःच्या देहावर त्याची इतकी सत्ता असते कीं, तो दुसऱ्याचे देहविकार आपल्या शरीरात खुशाल ओढून घेतो, पण आपल्या स्वतःच्या शरीराविषयीं त्याला पूर्ण अनास्था असते. अनत-कोटि ब्रह्मांडाच्या नायकाबरोबर तद्रूप झाल्यामुळे त्याला स्वतःच्या देहाची किंचित्‌ही पर्वा नसते.देह कोणत्या समयीं सोडावा लागेल त्याची त्याला पूर्ण माहिती असते.

असो जेव्हा स्वामी विवेकानद पूर्ण विजयी होऊन अमेरिकेतून हिंदुस्थानात परत आले, त्या वेळीं श्रीनागमहाशयांना भेटण्याची त्यांना इच्छा झाली, आणि त्याप्रमाणे श्रीमहाशयना आधीं कळवून ते त्याची भेट घेण्यास त्याच्या गांवीं गेले. श्रीनागमहाशयानीं त्याना कडकडून प्रेमालिंगन दिले. उभ-यता बसल्यावर श्रीनागमहाशयाच्या अनुयायानीं श्रीविवेकानंदांना हात जोडून प्रार्थना केली कीं, “ आम्हाला दोन गोष्टी उपदेशाच्या सांगा. कारण आमचे महाराज आम्हाला कांहीं सागत नाहींत. ” हें ऐकल्याबरोबर श्री विवेकानंद अत्यंत विस्मयपूर्ण मुद्रेनें म्हणाले “ अहो, तुम्ही याची हीच किंमत केली ! यांच्या समोर मी काय सगूं शकेन ? याची योग्यता इतकी थोर आहे कीं, यांच्या मनांतून जे विचारांचे ओघ निघत आहेत त्यांनीं तुमच्याच काय, पण सगळ्या जगाच्या विचारांची पालट होऊन योग्य तेंच घळण लागेल. ”

ही गोष्ट सांगावयाचे कारण हें कीं, अशा थोर महात्म्यांच्या इच्छे-मुळेंच आज आपण हयात आहोंत. रोमन, ग्रीक, खाल्डियन, बाबिलोनियन, असीरियन वगैरे आणि अलीकडच्यापैकीं स्पानियर्ड--ज्यांना सुमारें अडी-चशें वर्षांमागें इंग्लंड थरथरां कापत होते तीं सर्व राष्ट्रें आज कोठें आहेत !

आपण आज हयात आहोंत हे केवळ ईश्वरावर आपला पूर्ण भरंवसा असल्यामुळे, आणि त्या प्रभुकृपेनें असे पूर्ण ब्रह्मवेत्ते आपल्या देशांत निर्माण

होऊन त्याच्या आशीर्वादामुळे. जरी आजमितीला आपली स्थिति अशी खालावली आहे तरी या दैवी पुरुषाच्या कृपाछत्रामुळे आपली स्थिति सुधारून आपण पुन: उदयास येऊन झळकू यांत संशय नाहीं.

श्री साईबाबानीं यासाठींच "पुढे लई चागले दिवस येतील" असें आश्वासन दिलेले आहे. ही काहीं त्यानीं लोणकढी थाप दिली नाहीं. त्याचा शब्द कधीही मिथ्या होणार नाहीं याचा एक दाखला येथे देत आहे.

काहीं वर्षांमागे एका अपूर्व पर्वणीचा योग आला होता. श्री नाग-महाशयाच्या वडिलाच्या मनात त्या वेळीं श्री भागीरथीमध्ये स्नान करण्याचा विचार आला. वृद्धापकाळाने शरीर थकलेले, घरात अठराविश्वे दारिद्र्य, आणि त्यामुळे मुलाच्या योग्यतेचा अनुभव नाहीं, अशी त्या म्हताऱ्याची शोचनीय स्थिति झाली होती. मुलाची त्याने पुन: पुन, विनवणी केली, पण त्याचे एकच उत्तर "पाहूं." शेवटीं म्हातारा त्रासून त्याला टाकून बोलला " तूं नास्तिक आहेस. इतकी माझी इच्छा तुला पूर्ण करतां येऊं नये ? कशाला माझ्या पोटीं आलास ?" महाशय कांहीं बोलले नाहीं. पर्वणीचा दिवस उगवला. दोन प्रहरीं बारा बाजता स्नानाचा योग होता. म्हातारा अगदीं निराश आणि खिन्न झाला होता. दिवसा मध्यान्ह होण्याच्या सुमाराला त्याच्या जागेच्या एका कोपऱ्यातून पाण्याचा एक प्रवाह सुरू झाला. आणि म्हणता म्हणता पाणी जोराने निघून गावातून वाहूं लागले श्रीनाग महाशय घराच्या मागल्या बाजूस एका मोडक्या पडवींत श्रीप्रभूच्या ध्यानात निमग्न झाले होते. त्यांना हा प्रकार म्हाताऱ्याने सागितला. श्रीमहाशय तेथे धावत आले. " जय मा तू गरीबांवर कृपा केलीस ! जय गंगे ! जय भागीरथी ! धन्य तुझी लीला ! मा ! धन्य तुझी लीला !" अशी आरोळी करून डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहत आहेत अशा प्रेमानंद स्थितींत साष्टांग नमस्कार करून श्रीभागीरथीच्या पवित्र जळाचे आपल्या माथ्यावर सिंचन केले, आणि आपल्या वृद्ध पित्याला

श्रीभागीरथीच्या पाण्यांत स्नान करावयास सांगितलें त्याप्रमाणें त्यानें आणि गांवांतल्या सर्व लहानथोर स्त्रीपुरुषांनीं श्रीभागीरथीच्या नांवाचा जयघोष करून अत्यंत हर्षयुक्त उत्साहानें त्या श्रीभागीरथीच्या पवित्र जलांत स्नानें केलीं. आश्चर्याची गोष्ट ही कीं, तीन घटिका पर्वणीचा योग होता तों-पर्यंत हे पाणी वाहत राहिलें आणि नंतर ते बंद झाले. ही गोष्ट थोडयाच वर्षांपूर्वी घडली हा प्रकार ज्यानीं आपल्या डोळयानीं प्रत्यक्ष पाहिला आणि अनुभविला असे बरेच स्त्रीपुरुष त्या गावात आहेत.

असाच प्रकार शिरडीस थोडया वर्षांमागें घडला. त्या वर्षी असाच कांहीं अपूर्व पर्वणीचा योग आला होता. कै बापूसाहेब जोग आणि त्यांची पत्नी यांनीं कोपरगांवीं श्रीगंगेत स्नान करण्याचे योजिले. बापूसाहेब पर्वणीच्या आदल्या दिवशीं श्री साईबाबांजवळ परवानगीसाठीं गेले. श्री म्हणाले, "बापूसाब ! बघुं त्याचा विचार उद्या सकाळीं" बापूसाहेब म्हणाले, "बाबा, योग तर उद्या सकाळीं सात वाजताचा आहे आणि तो साधण्या-साठीं मोठ्या पहाटेस उठून चार वाजता तरी इकडन निघाले पाहिजे." श्री म्हणाले "बापूसाब ! आपुन सकाळला बघुं" बापूसाहेबानीं पुष्कळ प्रकारे विनवणी केली, पण बाबांचे एकच उत्तर "सकाळला बघू." बापूसाहेबांची आणि त्यांच्या सुशील पत्नीची निराशा झाली. बाई म्हणे असा योग आयुष्यांतून एकदा येतो पुनः यावयाचा नाहीं, पण बापूसाहेबांना श्री साईबाबाच्या आज्ञेचे उल्लंघन करून जाववेना. उभयताना ती रात्र फारच अस्वस्थतेची गेली. ती रात्र बाबाच्या चावडीची होती. पहांटेस बापूसाहेब बाबाच्या काकड आरतीला गेले. आरति संपते न संपते इतक्यांत गावांत ओरड झाली कीं, शिवेच्या ओढयाला पाणी आले. श्री साईबाबा बापू-साहेबाना म्हणाले "बापूसाब, तूं सगळी रात्र मला लई शिया दिल्यास, पण देवाची दया, गंगा आपल्यापाशीं आली जा, आतां आंघोळ करून घे." त्याप्रमाणें बापुसाहेब आणि त्यांच्या कुटुंबानें, आणि गांवातल्या लहानथोर सर्व स्त्रीपुरुषांनीं गंगेच्या पाण्यांत स्नानें केलीं.

पाट बांधून तयार होत होते. अजून पाणी सोडण्याला दोन चार महिन्यांचा अवकाश होता. गंगेचे पाणी इतक्यांत येईल हें कोणाच्याही स्वप्नीं नव्हतें. पण त्या रात्रीं पुष्कळ कोस दूरवर कोठचा बंधारा एकाएकीं फुटला आणि शिरडीच्या शिवेच्या ओढयात गंगेचे पाणी त्या दिवशीं पर्वणीच्या वेळी आले. नंतर तो फुटलेला बंधारा दुरुस्त करण्यांत येऊन, योजिल्या वेळेप्रमाणे दोन चार महिन्यांनीं श्रीगंगेचें पाणी रीतसर सोडण्यांत आले.

त्या दिवशीं दोन प्रहरीं आरतीच्या वेळीं बापूसाहेब सकाळीं घडलेल्या चमत्काराविषयीं सद्गदित वाणीने बोलत असता बाबा म्हणाले, "अरे बापूसाब, देव किनई लई कनवाळू आहे रे, आपुणच त्याच्यावर भरंवसा ठेवीत नाहीं आणि सबुरी पकडत नाहीं. हा "सबुरी" शब्द श्रींच्या मुखातून लेखकाने अनेक वेळां ऐकलेला आहे. सबुरी म्हणजे सतत, न ढळणारी निश्चित श्रद्धा.

सन १९१० सालीं सप्टेंबर महिन्यात जेव्हा लेखकाला श्री साईबाबाचें पहिल्यानदा दर्शन झाले, त्या वेळीं एका विहिरीच्या पाण्यावर याचे करूची भिस्त असे. त्या वेळींचे श्रींचे बोल लेखकाला स्पष्ट आठवतात. ते हे कीं, "अरे, गंगा आपल्या पायांपाशीं येईल." ह्या शब्दांचा त्या वेळीं कांहीं उलगडा झाला नाहीं. त्यानंतर काहीं वर्षांनीं सर्व्हे वगैरे होऊन नंतर सरकारनें मंजुरी देऊन गंगेचे पाणी अडवून पाटांत सोडण्यांत आलें. सन १९१० सालीं ज्यानीं कोपरगांव आणि शिरडीमधला आठ मैलाचा रुक्ष प्रदेश पाहिला होता त्याना पाटाच्या पाण्याने याच प्रदेशामध्ये किती तरी फेरफार होऊन उंसाचीं आल्हादकारक शेतें आज दिसत आहेत, आणि श्रीसाईबाबाच्या भाकिताची साक्ष पटवीत आहेत.

सर्व भक्तांचा चरणरज

"म्हातारा"

रा. रा. म्यानेजर साहेब, **श्रीसांई लीला** यांचे सेवेसीं.

रामराम वि. वि. सद्गुरु श्रीसांईबाबांच्या अतर्क्य सामर्थ्यानें मजसारख्या सर्व तऱ्हेनें अपंग मनुष्यास या त्रिविध तापानें सतत युक्त संसारांत अगदीं आणीबाणीच्या प्रसंगीं सहारा कसा दिला गेला व इन्क्युअरेबल म्हटल्या जाणाऱ्या व्याधीसही त्यांच्या अमानुष सामर्थ्यानें कसे बरें केलें त्याबद्दल मला आलेला अनुभव मी सेवेसीं पाठवीत आहे. त्यास श्रीसांई लीलेंत योग्य स्थान मिळेल अशी आशा आहे.

मी जातीचा मराठा असून उमरावतीचा राहाणारा आहे. शिक्षण साधारण लिहिणेंवाचणे इतकेच झाले असल्याने चरितार्थाकरितां मोटर ड्रायव्हरचे काम शिकून उदरनिर्वाह करीत असतों.

उमरावतीचा एक सावकार कांहीं मोटरी सजावदपासून खरगोण रोडवर चालवीत असल्याने त्याने मला बरोबर आणले व त्यायोगानें मला खरगोणास दररोज जाण्याचा मोका मिळाला.माझ्या भाग्यानें खरगोणास गणेश केशव रेगे रिटायर्ड अमीन साहेबांचे भेटीचा व समागमाचा मला अलभ्य लाभ झाला. ज्या ज्या वेळीं मी त्यांना भेटत असे त्या त्या वेळीं मोठ्या प्रेमाने व कळकळीने संसारात कसे वागावे ईश्वराच्या ठिकाणीं निष्ठा कशी ठेवावी व तसें केले असता काय परिणाम होतो या विषयावर दोन गोष्टी सागून श्रीसमर्थ सांईबाबांचे अनुभवही सांगत असत. असा क्रम बरेच दिवस सारखा सुरू होता, व त्यायोगे त्यांच्या ठिकाणीं माझी पूज्य बुद्धि कायम होऊन मी त्यांना माझ्या जन्मदात्या बापाहूनही अधिक मान देऊं लागलों, व तेही पोटच्या लेकराप्रमाणे माझ्यावर प्रेम करूं लागले, व माझे कल्याण होईल असा लौकिक व पारमार्थिक उपदेश करीत आहेत. माझ्या गरीबीमुळे द्रव्याची यत्किंचितही मदत नसताही त्याच्याच मध्यस्थीनें खरगोण येथील एका गरीब, पण सुशील बाईचे मुलीशीं माझा विवाह झाला. पुढे मोटर ड्रायव्हरीचे दररोजचे दगदगीच कामामुळें म्हणा किंवा माझ्या पूर्व संचिताने म्हणा, मला एकाएकीं लेप्रसीचा उद्भव झाला. मी दवाखान्यांत

बरेच महिने औषधोपचार केले, परंतु लेप्रसी हा असाध्य रोग आहे असे डॉक्टरसाहेबाचे म्हणणे पडले नुकतेच लग्न झालेले, घरात माझा धाकटा बंधु अज्ञान बारा वर्षांचा, व उदर निर्वाह तर मोटार चालविण्यावर अवलंबून. बिमारीमुळे माझ्या हातापायावर सूज आल्याने मोटर हाकणें कठीण झाले व अखेरीस ती नोकरी सोडावीही लागली मजला वस्तुकाम न झाल्याने माझे मालक वाणीबुवानीं आपल्या प्रकृतिगुणाप्रमाणे पैसा देणे बंद केले व सरते शेवटीं मला माझी पत्नी व धाकटा भाऊ यांच्यासमवेत माझ्या मोलमजुरीने निर्वाह करीत असलेल्या सासूचाच आश्रय करावा लागला त्या बाईने आम्हा सर्वांचा चरितार्थ अगदीं निष्काम बुद्धीने व अनेक अडचणी सोसून मोठ्या धैर्यानें चालविला खरा परंतु माझी दिवसेंदिवस बिघडत चाललेली स्थिति पाहून आतां पुढे काय होईल हा प्रश्न नेहमी डोळ्यापुढे उभा राही व मी मूढ होऊन बसे. अशा मनःस्थितींत असतांना एके दिवशीं मी माझ्या उद्विग्न विचारांना कंटाळून दुःखाचा थोडा परिहार व्हावा या हेतूने सदरी पेन्शनर अमोन साहेब--ज्याना आम्ही सर्व ''काकासाहेब'' म्हणतों त्यांच्याकडे गेलों. त्या वेळीं ते श्रीमत् भगवत् गीतेचा पाठ करीत बसले होते. त्यांच्या घरीं गेल्यावर मी त्यांना नमस्कार केला व त्यानीं मजकडे मोठ्या प्रेमदृष्टीनें पाहाताच मला रडूं येऊं लागलें. माझी अशी दीन दशा पाहून त्यानीं मला म्हटले कीं,''संपतराव, घाबरूं नको,धीर सोडूं नको.तुझी बिमारी लौकिकदृष्ट्या असाध्य ठरली असली तरी परमेश्वरास कांहीं असाध्य नाहीं.'' असें सांगून त्यानीं आपले संकटाचे दिवस व त्यातून श्रीसाईबाबानीं कसकशी सुटका केली ह्याबद्दल सविस्तर हकीकत समजावून आतां तूंही अनन्यभावाने बाबाचे पाय धर असा उपदेश केला. समर्थांचा एक फोटो देऊन त्याची दररोज एकाग्र मनाने पूजा करीत जा व तीर्थ घेत जा म्हणजे बाबा तुझ्या संकटांतून तुला बाहेर काढतील. विश्वास ठेव व धीराने काम कर असें मोठ्या गोड शब्दाने मला सांगितले. त्यांच्या उपदेशाप्रमाणे मी सर्व भार बाबावर टाकून त्याची मनाभावाने सेवा सुरू केली. तों काय चमत्कार झाला कीं, आठ दहा दिवसाचे आंतच मला खबर लागली कीं, महेश्व-

गास एकजण ह्या बिमारीवर खैरात औषध देत असतो हे ऐकून मी त्या सद्‌गृहस्थाकडेस गेलो. व त्यास प्रकृति दाखविली. त्याने मजकडेस पाहून उत्साहपूर्वक सांगितले कीं, बेटा घाबरू नकोस सतत एक महिना माझे औषधाचे सेवन कर व पथ्य सांभाळ, मुदतीचे आतच तू बरा होशील. हे शब्द ऐकताच मला आनंदाश्रु लोटले व मी त्याचे पायांवर लोळण घेतली. त्याचेही अंतःकरण द्रवलें, व त्याने लगेच औषधाची योजना सुरू केली. औषध मीं एक महिना सतत घेत होतों महिना अखेरीस तो गृहस्थ मुद्दाम महेश्वराहून खरगोणास आला, व माझी प्रकृति पाहिली व म्हणाला कीं, बेटा तुझा रोग बरा झाला आहे आता मात्र माझ्या औषधाचा उतार देतो तो घे व काहीं काळजी करू नको ईश्वराने माझे हातास यश दिले हे पाहून मला संतोष होत आहे बाद त्याचे आज्ञेप्रमाणें मी उतारही घेतला व आतां मी पूर्ववत्‌प्रमाणे अगदीं गतव्याधीं झालों आहे व कामावर रुजूही झालों आहे. सारांश काय कीं, माझ्यासारख्या दीनाच्या विपन्न अवस्थेत त्या दीन दयाळ साई माउलीलाच दया येऊन त्यांनीच संकटात धांव घेऊन माझें रक्षण केले नाहींपेक्षा माझी इहलोकयात्रा बहुतेक संपलीच होती ह्या माझ्या अनुभवावरून भगवंतानीं गीतेतील तेराव्या अध्यायांत उत्तम, मध्यम व कनिष्ठ अधिकाऱ्याहूनही मंदतर अधिकाऱ्याचाही उद्धार करतों असे साक्षात् वचन देऊन "अन्येत्वेवमजानन्तः श्रुत्वान्येभ्य उपासते ॥ तेऽपि चाति तरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥ ह्या मंत्राने साधारण मनुष्याच्या तरणोपायाचा मार्ग घालून दिला आहे. त्या मंत्राचे एकाग्र चित्ताने अनुष्ठान केले असता समर्थ सर्वज्ञ सर्वाधार व भक्त कनवाळू प्रभु कधींही भक्ताची उपेक्षा करीत नाहीं हे सिद्ध होत आहे. त्या सर्वांतर्यामी सर्वेश्वरास तन-मन-धन अर्पण करून त्याची कृपा भाकून मी आपली रजा घेतों लोभ असावा हे विनंती..

श्रीसाईचरणरज

**संपतराव देशमुख**

मोटारड्रायव्हर

वरील अनुभवासंबंधाने श्रीयुत जी. के. रेघे पेन्शनर अमीन खरगोण होळकर स्टेट यांजकडे तपास करितां त्यांच्याकडून खरगोणहून ता. २–१०–२९ रोजीं प्रत्युत्तर आलेल्या पत्रांतील उतारा:—

"त्यास महारोग उद्भवला त्या वेळीं त्याच्याकरिता मी डॉक्टर लोकांची बरीच खुशामत केली, परंतु रोग असाध्य, आमचा इलाज नाहीं असा जबाब मिळाल्याने अखेर मीच त्याला श्री समर्थांचे पाय धरण्यास सांगितलें व त्या दीनदयाळ माउलीने त्यास संकटातून मुक्तही केलें. बाबाचे मला वेळोवेळीं जे अनुभव आले त्यापैकीं काहीं मी साईलीलेंत दिलेच आहेत व अजूनही त्याच्या अजब लीलेचे चमत्कार घडत आहेत ते साईलीलेंत प्रसिद्ध होऊन भक्ताचे अंतःकरणात भक्ति जागृत राहावी अशी माझी भावना आहे.

**रा. आ. तर्खड,**

—संपादक.

## श्रीसाईसमर्थ

पूर्वी घरांतल्या मंडळीजवळ नेहमीं उद्गार काढत असे कीं, जर मला श्रीबाबाच्या कृपेनें नोकरी लाभली तर मी पहिल्या पगारातून श्री बाबांची दक्षणा व शिर्डीस जाण्याचा खर्च करीन. पुढे १९?७ सालांत मला ३५ रुपयांवर नोकरीं मिळाली व पहिल्या पगारांतून प्रथम श्रीबाबास देण्यास दक्षणा रुपये २० व रुपयें १५ श्री शिर्डीस जाण्यास असे ठरविले पुढें श्री शिर्डीस जाण्यास कोणाबरोबर जावे हा प्रश्न उभा राहिला व त्या वेळेस आधेरीचे कै वेद्रे मास्तर आमच्या गावांतल्या शाळेत हेडमास्तर होते. त्यांनीं मला श्री शिर्डीस जावयाचे आहे. जर आपणास यावयाचे असल्यास माझी चांगली सोबत होईल. व मी त्याच्याबरोबर दादरवरून ४ च्या प्यासेंजर गाडीने जाण्याचे ठरविले. तो विचार मी आमच्या घरात कळवून श्री शिर्डीस जाण्यास दुपरीं निघालो माझा जाण्याचा विचार झाला असें पाहून माझ्या मोठ्या बहिणीस फार वाईट वाटले.ती म्हणूं लागली कीं,आपण श्री बाबाची

सारखी भक्ति करीत असतांना श्री बाबानीं तुलाच शिर्डीस जाण्याचा योग आणला व मला आणू नये ही एक आश्चर्याची गोष्ट आहे व आपण श्री बाबाच्या फोटोजवळ अश्रु ढाळीत बसली ते पाहून मला फारच वाईट वाटलें व मी तिला म्हणालों मी एकदां श्रीबाबाचे दर्शन घेऊन आलो म्हणजे सवडीप्रमाणे घरातील प्रत्येकास श्रीशिर्डीस नेऊन बाबाचे दर्शन करवीन तरी पण तिची समजूत होत नाहीं तेव्हा माझ्या आईने उसने पैसे घेऊन तिला माझ्या-बरोबर जाण्यास सांगितलें व आम्हीं दोघे व कै. बेंद्रे मास्तर, त्याचे कुटुंब व आमच्या शेजारच्या गावची एक वृद्ध लोहारीणबाई असे श्री शिर्डीस निघालो व दुसरे दिवशीं सकाळीं दहा वाजता श्रीशिर्डीस पोचलो त्या वेळेस श्रीबाबा श्री लेंडीवर जाण्यास निघाले होते तेव्हा आम्हीं ताबडतोब आमचें सर्व सामानसुमान कै दीक्षितांच्या वाड्यात ठेवून त्या दर्शनाचा लाभ घेतला नतर स्नान आटोपून श्रीबाबा मशिदींत बसले होते त्याच्या दर्शनास गेलों मशिदींत भक्तमंडळींची बरीच गर्दी असल्यामुळे कै बेंद्रे व मला बसण्यास जागा नव्हती म्हणून आम्हीं श्रीबाबांच्या समोर उभे राहिलो. तेव्हां कै. बुटी साहेबानीं श्रीबाबाच्या जवळ तंबाखूची चिलमी भरून ती त्याच्या हातांत दिली व त्यांनीं तिचा एक झुरका मारून ती माझ्याकडे नजर लावून मला देऊं लागले माझी ही प्रथम शिर्डीची खेप असल्यामुळे मला ती त्याच्या हातातून घेणे प्रशस्त वाटले नाहीं. व मी त्यांना सांगितले बाबा मी लहान असल्याकारणाने तंबाखू ओढत नाहीं तेव्हा त्यानीं आपला हात मागें घेऊन इतर भक्तमंडळींस आळीपाळीनें दिली. अंमळशाने श्रीबाबानीं मजकडे दृष्टि लावून १० रुपये दक्षणा मागितली व ती मी वाड्यात जाऊन श्रींस आणून दिली. नतर त्यानीं कै. बेंद्रेकडून घेतली व नंतर माझी बहीण बायकात बसली होती तिजकडून मागितली व पुनः मजकडून मागितली व मी त्याची ठराविक रक्कम त्यास आणून दिली. पुढें आम्हीं वाड्यात गेल्यानतर आमचा परत घरीं जाण्याचा हिशोब तपासून पाहातों तो आम्हास थोड्या पैशाची तूट पडत होती व आम्हीं श्रीशिर्डीत नवीन असल्याकारणाने भक्तमंडळीची

चांगलीशी ओळख झाली नव्हती. तेव्हां आम्हांस मोठा विचार पडला नंतर आम्हीं कै बेद्रे मास्तरांस थोडे उसने पैसे देण्याचें विचारिले. तेव्हां ते म्हणाले मी माझ्याबरोबर जास्त पैसे आणले नाहींत उलट मी श्रीबाबांच्या दक्षणेच्या पैशांतून श्रीशिर्डीस आलों. नंतर आमच्याबरोबर जी वृद्ध लोहारीण बाई आली होती ती म्हणूं लागली कीं, अहो आपण श्रीबाबांच्या चरणाजवळ आलों असतां अशी का काळजी करता. तेव्हां आम्हीं सर्व हकीकत तिला निवेदन केली व ती म्हणु लागली,अहो,श्री बावांची तुमच्यावर पूर्ण कृपा आहे म्हणून श्रीबाबानीं तुमच्याकडून दक्षणा मागितली माझ्यावर कृपा नाहीं म्हणून माझ्या-जवळून एक पै सुद्धां दक्षणा घेतली नाहीं.त्यानीं तुम्हास येथवर आणले आहे तेच तुम्हास घरीं सुखरूप नेतील त्याबद्दल आपण काळजी करू नये तुम्हास पैशाची अडचण पडल्यास तुम्ही मजकडून घ्या व घरीं गेल्यानंतर आपल्या सवडीप्रमाणे माझे पसे परत करा हे त्या बाईच्या तोंडून उद्गार निघताच आम्हांला मोठा आनद झाला व श्री बाबाच्या लीलेचे कौतुक वाटले

रात्रीं जेवणखाण आटोपल्यावर श्री बाबाची मशिदींतून चावडीवर निघण्याची तयारी चालली होती व भक्तमडळी आपआपल्या मित्र मंडळीस बाबाच्या सेवेकरितां चवऱ्या, चामरे व पंखे वगैरे देत होती तेव्हा माझ्या मनांतून श्री बाबाच्यावर चवरी, चामरे किंवा पखे यातून काहीं तरी एक वस्तु ढाळण्याचे होतें;पण मला ती कोणाजवळून मागून घेण्याचा धीर होईना. व आपण ह्या बाबाच्या सेवेला मुकणार, कारण माझी ती प्रथम वेळ असल्या-कारणाने माझी कोणाबरोबर चांगलीशी ओळख नव्हती. माझ्या मनांत अनेक विचारांनीं खळबळ उडाली इतक्यांत श्रीबाबांनीं माझ्या मनांतला हेतु जाणून एक भक्त आपोआप माझ्याजवळ एक चवरी देऊन आपण श्रीबाबा-वर चवरीचा ढाळतां काय ? असे विचारून चालता झाला ते पाहून मला आनंद वाटला. व श्रीबाबा सर्वज्ञ आहेत व आपल्या लेकरांचीं वेळोवेळीं कोडकौतुके कशीं पुरवितात याचा पूर्ण अनुभव आला.

आनंदराव परशुराम डोळस

मी दरसाल श्रीशिर्डीस उत्सवाला कै गोविंद रघुनाथ दाभोळकर व रा. रा. रघुवीर भास्कर पुरंदरे यांच्याबरोबर जात येत असतों व श्रीशिर्डीस सुखरूप पोंचल्याचें व निघण्याचें पोष्ट कार्ड घरीं पाठवीत असतों. १९२३ सालांत पावसाळ्याचे दिवसांत माझें कुटुंब बाळंतीण असताना मी उत्सावास गेलों व तेथून मी अमुक दिवशीं अमुक वेळेस येण्याचा कार्ड घरीं पाठविला असताना कांहीं कारणामुळें कै. अण्णासाहेब दाभोळकर व पुरदरे यांचा निघण्याचा बेत आम्हीं ज्या दिवशीं निघणार त्याच्या थोडा वेळानें झाल्यामुळे मला पत्रात लिहीलेल्या वेळेप्रमाणे घरीं येता आले नाहीं व घरची मंडळी काळजी करूं लागली व मनांत नाना तऱ्हेचे विकल्प आणूं लागली कीं,हल्लीं पावसात श्रीगोदावरीस जास्त पाणी झाले असेल कीं काय अशी काळजी करू लागली व माझे कुटुब दुपारीं जेवण झाल्यानंतर विचार करीत असता तिला झोप लागली व तिने खालीं लिहिल्याप्रमाणे स्वप्नपाहिलें:—

आमच्या गांवापैकीं एक वृद्ध ब्राह्मग आपल्या बरोबर एक १४-१५ वर्षांचा तेजस्वी मुलगा घेऊन आमच्या दारांत उभा राहून माझ्या आईस हाक मारून म्हणाला कीं, आपण आपल्या मुलाची काळजी करण्याचे कांहीं कारण नाहीं, तो आमच्या येथे कांहीं परक्या ठिकाणीं नव्हता. तो चागला सुखरूप होता असे म्हणून त्या मुलास पुढे करून आईस म्हणाला, हा घ्या तुमचा मुलगा असे म्हणून आपण अदृश्य झाला.

इतक्यात माझे कुटुंब जागे होऊन पाहूं लागले तो स्वप्नांतील ब्राह्मग व तो मुलगा देखील नाहीं व त्याच दिवशीं सध्याकाळीं मी श्रीशिर्डीहून घरीं आलो.

( ३ )

श्रीबाबा समाधिस्थ होण्याच्या आदले दिवशीं माझ्या मोटया बहिणीनें पाहिलेलें स्वप्न:—

" मीं श्रीशिर्डीस गेलों व परत आलो तेव्हां फक्त श्रीबाबांचा प्रसाद आणला व तीर्थ आणले नाहीं. तेव्हां बहीण माझ्यावर रागावली "

दुसऱ्या दिवशीं श्रीबाबा समाधिस्थ झाले ही आम्हास बातमी लागली.

आ. प. डोळस.

माझे वडील आपल्या मिळकतींतून दरमहिन्यास दररुपयास प'व: आणा प्रमाणें धर्मफंड म्हणून काहीं रक्कम काढतात त्याप्रमाणे मी नोकरीस लागल्यावर माझ्या मिळकतींतून काहीं तरी रक्कम श्रीबाबांच्या नावाने निराळी काढून ठेवीत असे पुढें ती रक्कम श्रीशिर्डीस बाबास कशी पोंचेल ही मला रात्रंदिवस काळजी होती व मी श्रीबाबांजवळ आपल्या नांवाने काढलेली रक्कम आपण कोणत्याना कोणत्या रूपे आमच्याकडून आपणांस मिळेल असा मार्ग दाखवावा अशी प्रार्थना करीत असे त्या वेळीं कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर व कै हरी सिताराम दीक्षित याचो माझ्याबरोबर चागली ओळख नव्हती ते फक्त वरचेवर श्रीशिर्डीस जात येत असत एवढे माहीत होते अशा विचारात बरेच दिवस लोटल्यावर मी एके दिवशीं रात्रीं मेलचे काम आटोपून चर्चगेट स्टेशनवर ८-२० च्या गाडीने ऑफिसमधन घरीं परत येत असताना कै. दाभोळकर त्याच गाडीने पार्ले येथ कै. दीक्षिताकडे काहीं कारणास्तव जातांना माझे डब्यात येऊन माझ्या शेजारीं बसले, तरी पण त्याची माझी ओळख नसताना मी त्यास गाडींत नमस्कार केला व त्यांची ओळख करून घेतली व त्याना श्रीबाबाच्या नावाने काढलेल्या रकम श्रीशिर्डीस बाबांकडे कशी रवाना होईल व दुसरी बरोच माहिती पार्लें स्टेशन येईपर्यंत विचारून घेतली व त्यानीं मला योग्य सल्ला देऊन श्रीशिर्डी संस्थानची सर्व बातमी दिली व श्रीसाईलीलेच्या सभासदांच्या वर्गणी-दाराबद्दल वगैरे सांगितले अशा रीतीनें मी श्रींचे कृपेने सामान्य वर्गणीदार होऊन तेव्हांपासून प्रत्येक उत्सवास त्यांच्या व रा. रा. पुरंदरे यांच्याबरोबर श्रीशिर्डीस जात येत होतो. आता ऑफिसच्या कडक कायद्यामुळे मी दर रामनवमीच्या उत्सवास जातो व अशा प्रकारे श्रीबाबांनीं माझ्या सर्व अडचणी दूर केल्या व पुढेही करतील अशी मी रात्रंदिवस त्यांच्याजवळ प्रार्थना करितो

कांदिवली. } आपला नम्र,
आ. प. डोळस.

श्री दासगणुकृत

अर्वाचीन

# श्री भक्तलीलामृत

ॐ श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीभवानीशंकराय नमः । श्रीरमारमणाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीगुरु प्रल्हाद-राजाय नमः । श्रीगुरु वामनाय नमः । श्रीकवीश्वराय नमः । जय-जयाजी मोरेश्वरा । दयानिधे योगेश्वरा । कृपा करी गा दातारा । दासावरी सत्वरी ॥ १ ॥ जयजयाजी गजानना । जयजयाजी मूशकवाहना । जयजयाजी विघ्नकंदना । गौरीपुत्रा दयानिधे ॥ २ ॥ तूं ऋद्धिसिद्धींचा नायक । तूं कलिमलाचा विध्वंसक । तूं दीनांचा कल्पतरू देख । उपेक्षीना सर्वथा ॥ ३ ॥ तुझ्या पदा शरण रिघतां । विघ्नें भस्म होती तत्त्वतां । अगाध असे तुझी सत्ता । वर्णू न शके दास गणू ॥ ४ ॥ तूं कविजनांचें माहेर घर । तूं सुबुद्धीचा सागर । तूं मुमुक्षूंचें मानस सरोवर । धांव वेगें लवलाहीं ॥ ५ ॥ जयजयाजी विधिकन्यके । भक्तप्रिये भक्तपालिके । हे त्रिभुवनसुंदरी अंबिके । पाव वेगें सरस्वती ॥ ६ ॥ तूं आदिमाया प्रणवरूपिणी । तूं जगत्र-याची स्वामिणी । हे श्वेतवसने हंसवाहनी । अंत माझा पाहूं नको ॥ ७ ॥ अंबे तुझें पाहतां वदन । लज्जित झाला रोहिणीरमण । तव स्वरूपाचें करितां ध्यान । तटस्थ होती सर्व ऋषी ॥ ८ ॥ माते तुझा अगाध महिमा । अगम्य असे निगमागमा । निज भक्त नेसी आरामधामा । साह्य करिसी तयांचें ॥ ९ ॥ तुज वर्णितां भुवनसुंदरी । शिणले ते वेद चारी । तेथें माझा काय तरी । पाड असे सांग